महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute (MAHAJYOTI) ची कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीसाठी प्रथम संचालक व संस्थेचे सदस्य यांच्या नियुक्तीस मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१९/प्र.क्र.१११/मावक
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक : ९ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :- १) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१९/प्र.क्र.१११/मावक, दि.६ जुलै, २०१९
२) विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१९/प्र.क्र.१११/मावक, दि.८ ऑगस्ट, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

शासन निर्णय, विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१९/ प्र.क्र.१११/ मावक, दि. ६ जुलै, २०१९ अन्वये विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या विविध प्रवर्गातील युवक युवतींसाठी विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी “सारथी” संस्थेच्या धर्तीवर स्वायत्त संस्था स्थापन करण्यासाठी आवश्यक त्या शिफारशी शासनास करण्यासाठी मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग आणि कामगार विभाग) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने दि.२९.०७.२०१९ रोजी समितीचा अहवाल सादर केला असून या अहवालाच्या आधारे विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण तसेच इतर वंचित व दुर्लक्षित घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या अनुषंगाने संशोधन व अभ्यास करणे तसेच त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी विद्यार्थी, युवक § युवती इ.साठी विविध उपक्रम इ. राबविणे व इतर माध्यमाने त्यांच्यासाठी विविध कार्यक्रम राबविण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन प्रशिक्षण संस्था (महाज्योती) Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute (MAHAJYOTI) स्वायत्त संस्था स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मा.मंत्रिमंडळाच्या दि.३० जुलै, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार दि.८ ऑगस्ट, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

१. विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग व शासन/महाज्योती संस्था ठरवेल त्याप्रमाणे इतर वंचित आणि दूर्लक्षित घटक यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी **“महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती)** [Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute (MAHAJYOTI)]” या नावाची एक स्वायत्त संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर संस्थेचे मुख्यालय पुणे येथे राहील.

२. सदरहू संस्थेची नोंदणी कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नियम ८ अन्वये करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर “महाज्योती” संस्था स्थापन व कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यक ते निर्णय घेण्याचे अधिकार मा.मंत्री (विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण) यांना प्रदान करण्यात येत आहेत.

शासन निर्णय दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ मधील तरतूदीनुसार महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute (MAHAJYOTI)
या संस्थेची कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ अंतर्गत नोंदणीसाठी “ प्रथम संचालक ” आणि महाज्योती स्थापन करण्यासाठी शासनाचे प्रतिनिधी म्हणून “ सदस्य ” यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन याद्वारे महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) Mahatma Jyotiba Phule Research and Training Institute (MAHAJYOTI) या संस्थेची कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ अंतर्गत नोंदणीसाठी “ प्रथम संचालक ” (First Directors) म्हणून खालील पदाधिकारी / अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव	पदनाम
१	डॉ. संजय कुटे, मा.मंत्री, कामगार, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२	श्री.जे.पी.गुप्ता, प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई	संचालक
३	श्री.राजेश कुमार, प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (कामगार), मंत्रालय, मुंबई	संचालक
४	श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई	संचालक
५	श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई	संचालक
६	श्री.डी.आर.परिहार, सेवानिवृत्त भा.व.से. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे-४१२१०५	संचालक

उपरोक्त प्रथम संचालकांपैकी उपलब्ध कोणत्याही ३ व्यक्तींची प्रथम संचालक (First Director) म्हणून महाज्योती या संस्थेची कंपनी कायदा २०१३ अंतर्गत कलम ८ अन्वये नोंदणी करुन घेण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

सदर कंपनी शासनाच्या मालकीची असल्याने शासनाचे प्रतिनिधी म्हणून पुढील तक्त्यात नमूद सदस्य यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम
१	अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२	प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३	प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४	प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
५	प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊद्योग) मंत्रालय, मुंबई
६	प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार) मंत्रालय, मुंबई
७	प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग (कृषी) मंत्रालय, मुंबई
८	प्रधान सचिव, कौशल्य विकास विभाग व उद्योजकता विभाग मंत्रालय, मुंबई

वरील परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार प्रथम संचालक म्हणून नियुक्त पदाधिकारी / अधिकारी पैकी जे व्यक्ती प्रथम संचालक म्हणून महाज्योती संस्थेची नोंदणी करणार त्याव्यतिरिक्त पदाधिकारी / अधिकारी यांची संचालक म्हणून नियुक्तीबाबत महाज्योती या संस्थेच्या संचालक मंडळाच्या प्रथम बैठकीत उचित निर्णय घेण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०८१४१०५८३०२२२२ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.08.14 11:08:35 +05'30'

(भा.र.गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री/राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. सर्व सन्माननिय विधानसभा/विधान परिषद सदस्य
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन सर्व विभाग
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई-१/नागपूर-२
९. महालेखापाल (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई-१/नागपूर-२

१०. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११. श्री.राजेश कुमार, प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (कामगार), मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊद्योग), मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग (कृषी), मंत्रालय, मुंबई
१४. प्रधान सचिव, कौशल्य विकास विभाग व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. श्री.डी.आर.परिहार, सेवानिवृत्त भा.व.से. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी, पुणे (डी-१/३, केंद्रिय विहार, सेक्टर-४, मोशी, पिंपरी चिंचवड, पुणे-४१२१०५)
१८. व्यवस्थापकीय संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
१९. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे
२०. आयुक्त, समाज कल्याण, पुणे
२१. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
२२. सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. निवडनस्ती (मावक)